# पेप्सीकोने बनविले यंगीस्तानसाठी आगळेवेगळे राष्ट्रगीत

## युवकांनी युवकांसाठी युवकांवर तयार केलेले अभिनव राष्ट्रगीत

**पुणे :** मराठमोळ्या भाषेत तुमच्या स्वतःची ओळख सांगणारे गाणं तुम्ही कधी ऐकले आहे का? असे गीत की जे अगदी तुम्हाला स्वतःच वाटावं .. ज्यात स्वतःचं प्रतिबिंब उमटावं . . . जे ऐकल्याने आश्चर्याचा सुखद अनुभव मिळावा. . होय असे तरुणाईचे नवे गीत तुम्हाला आता ऐकायला मिळणार आहे.

तरुणाईचे यंगीस्तानचे असे नवे गीत पेप्सीने आज त्यांच्या अभिनव प्रसारमोहिमेत सादर केले. ते यंगीस्तानचे राष्ट्रगीतच म्हणावे लागेल. यंगीस्तान का वॉव अशा काव्यपंक्तींनी सजविलेल्या या गीताला संगीत दिले आहे विशाल आणि शेखर या लोकप्रिय संगीतकारांनी. यंगीस्तानच्या या गीतासाठी आयोजित केलेल्या संगीत रजनीच्या महाअंतीम फेरीत वॉव या शब्दाचा मधूर वाणीने उच्चार करणाऱ्या स्पर्धकांनी रंग भरला.

युवकांना शब्द वाक्प्रचार आणि म्हणींच्या आधारे साकारीकरण करण्याची संधी त्यांना देण्यात आली. यंगीस्तान का वॉव ही त्याची मूळ संकल्पना होती. या मोहिमेला हजारो युवकांनी भरभरून प्रतिसाद दिला. यंगीस्तानच्या गीतरचनेतच नव्हे तर त्याच्या संगीत निर्मितीतही ते सामील झाले. स्वतःच तयार केलेले हे युवागीत स्फूर्ती देणारे राष्ट्रगीत विशाल आणि शेखर या संगीतकारांसमवेत ऐकताना हे युवक भारावून गेले.

पेप्सीच्या या अभिनव उपक्रमाबद्दल बोलताना कोला पेप्सीको इंडियाच्या मार्केटिंग विभागाचे कार्यकारी उपाध्यक्ष संदीप सिंग अरोरा म्हणाले की, यंगीस्तान का वॉव हा युवकांचा आवाज आहे. त्यात युवकांची कल्पकता, नाविन्यपूर्ण संकल्पना, त्यांची मते ,त्यांचा स्वभाव, त्यांचे ज्ञान आणि हालचाली याचे प्रतिबिंब उमटले आहे. देशभरातील तरुणांच्या नसानसात भिनलेले ते एक महान काव्य आहे. तरुणांना प्रेरणा देणारे गाणे प्रत्येक तरुण गुणगुणताना दिसतो आहे. हजारो स्पर्धकांनी भाग घेऊन पेप्सीच्या ब्रॅण्डवर आपला नितांत विश्वास असल्याचे दाखवून दिले आहे. त्यांनी सादर केलेल्या भावना याच पेप्सीच्याही भावना आहेत.

## संगीतकार विशाल व शेखर यांचा नवा आविष्कार




संगीतकार विशाल आणि शेखर याबाबत बोलताना म्हणतात की, पेप्सी जेव्हा त्यांनी ही अभिनव संकल्पना घेऊन आमच्याकडे आले तेव्हा आम्ही भारावूनच गेलो. यंगीस्तान का वॉव हे गीत एका दिवसात तयार करताना आम्हीच आश्चर्यमय झालो. लक्षावधी युवकांच्या भावना त्यांचे विचार एकाच गाण्यात आणि तेही एका दिवसात सादर करण्याचा अनुभव आम्हाला आनंददायी ठरला.

पेप्सीचे ब्रॅण्ड ॲम्बेसेडर रणबीर कपूर म्हणाले की, युवकांच्या या राष्ट्रगीतात त्यांच्या भावनांचे खरेखुरे प्रतिबिंब उमटले आहे. हे गीत म्हणजे त्यांचा आविष्कार आणि स्वातंत्र्य याचे प्रतिक आहे. वॉव या शब्दासारखे खरोखरीच कुतुहल वाढविणारे असे हे गीत आहे. युवकांनी युवकांसाठी तयार केलेले हे अफलातून गीत म्हणजे यंगीस्तानला वाहिलेले पुष्पच आहे. वॉव या शब्दातून त्यांचे प्रेम,मैत्री,त्यांची स्वप्ने अणि प्रेरणा यांचा अनोखा अनुभव मिळतो.

यंगीस्तान का वॉव ही अभिनव संकल्पना आता हाय डेसीबलवरून सादर केली जाईल. डिजिटलच्या माध्यमातून त्याचा प्रचार केला जाईल. ज्याला त्याला ऑनलाईन ही संकल्पना पाहायला मिळेल. अवकाशात आणि भूप्रदेशावर सतत ही संकल्पना लोकांपर्यंत पोहोचविली जाईल.

पेप्सीको इंडियाबाबत : पेप्सीकोचे भारतात १९८९ मध्ये आगमन झाले. त्यानंतर खाद्यपदार्थ आणि सरबताच्या उत्पादनात पेप्सीकोचा झपाट्याने विस्तार झाला. या उद्योगसमूहाचे भारतात ४१ ठिकाणी बॉटलिंग प्रकल्प आहेत. त्यात उच्च दर्जाची सरबते, न्याहारीचे पदार्थ आणि निर्यातीसाठी लागणारे साहित्य बनविले जाते. यापैकी १३ प्रकल्प कंपनीच्या स्वतःच्या मालकीचे आहेत तर २८ प्रकल्प ठिकठिकाणच्या शाखांना चालविण्यासाठी देण्यात आले आहेत. याशिवाय पेप्सीको फ्रिटो कंपनीच्या खाद्यान्न विभागाने तीन ठिकाणी कलात्मक प्रकल्प उभारले आहेत. उद्याचे स्वप्न आजच सत्यात आणा हे पेप्सीकोचे ब्रीद आहे.

संपूर्ण जगात खाद्यपदार्थ आणि सरबतांचा कोट्यवधी डॉलर्सचा व्यवसाय करणारी पेप्सीको ही ख्यातनाम कंपनी आहे. त्यात विविध प्रकारच्या अठरा उत्पादनांचा समावेश आहे. त्यातील प्रत्येक उत्पादन हे दरवर्षी किमान एक दशलक्ष डॉलर्सचे उत्पन्न मिळवून देते. फ्रिटो ले, क्विकर, पेप्सी कोला, ट्रॉपिकाना आणि गेटोरेड ही पेप्सीकोची प्रमुख उत्पादने आहेत. याशिवाय चविष्ट आणि पौष्टिक असे हजारो खाद्यपदार्थ आणि पेये पेप्सीकोच्यावतीने बनविण्यात येतात. दोनशेहून अधिक [illegible]तील ग्राहकांपर्यंत ही उत्पादने पोहोचविली जातात. २००८ मध्ये कंपनीचा महसूल हा ४३ महापद्म डॉलर्स एवढा होता. समृध्दीकडे वाटचाल करणाऱ्या या कंपनीत एक लाख ९८ हजार कर्मचारी एकोप्याने काम करतात. कंपनीला प्रगतीच्या दिशेने घेऊन जातात. ग्राहकांना निवडीचे स्वातंत्र्य देताना त्यांच्या आरोग्याला महत्व देतात. त्यांची सोय आणि उत्साह याला प्राधान्य देतात. पर्यावरणाचे संतुलन राखण्यास मदत करतात. ते सतत कार्यमग्न असतात. सामाजिक बांधिलकीचे भान ठेऊन जगभरातील विविध घटकांना मदत करण्याचे भरीव कार्यही पेप्सीको करीत आहे. याबाबतच्या अधिक माहितीसाठी www.pepsico.com या संकेतस्थळावर संपर्क साधा.